# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

दालन क्र. १७, जिल्हा परिषद पालघर इमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४
ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्रमांक :- ०२५२५-२०५४११

## -: उमेदवारांना सूचना :-

TAIT २०२५ पवित्र पोर्टल भरती प्रक्रिया २०२६ अंतर्गत पालघर जिल्हाकडील टप्पा -१ मध्ये उपलब्ध झालेल्या इ.१ ते ५ व इ. ६ ते ८ गटातील एकूण ८२२ उमेदवारांचे समुपदेशन दिनांक १६/०९/२०२६ ते दिनांक १८/०९/२०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.

सदर समुपदेशनामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पसंतीनुसार तालुका व शाळांची निवड केलेनुसार त्यांचे पदस्थापना आदेश तालुकास्तरावर निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तरी समुपदेशन झालेल्या सर्व उमेदवारांनी (समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेले वगळून उदा. प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,खेळाडू,अनाथ,दिव्यांग व TET गैरप्रकार इ.) उर्वरित उमेदवारांनी त्यांच्या **पदस्थापनेचे मूळ नियुक्ती आदेशाची प्रत दिनांक-२८/०९/२०२६ रोजी पासून त्यांनी निवडलेल्या तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयामध्ये सार्वजनिक सुट्टि वगळून कार्यालयीन वेळेत गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करून दिनांक-२८/०९/२०२६ रोजी पासुन संबंधित शाळेवर रुजू व्हावे.**

## -: समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांसाठी सुचना :-

१. समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांचे लाभाचे मुळ प्रमाणपत्र वितरित केलेल्या संबंधित सक्षम प्राधिका-यांकडून सदर प्रमाणपत्राची वैधता पडताळणी नंतरच संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. TET गैरप्रकारातील उमेदवारांबाबत मा.आयुक्त (शिक्षण) यांचेकडील दि.२८/०८/२०२६ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्रमांक १४ नुसार कार्यवाही पुर्ण झाल्यानंतरच संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. उपरोक्त मुद्दा क्रमांक १ व २ च्या अनुषंगाने प्रशासकिय कार्यवाही सुरु करण्यात आली असुन मुद्दा क्रमांक १ व २ च्या संबंधातील उमेदवारांच्या नियुक्ती आदेशाबाबतच्या सुचना स्वतंत्रपणे वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील याची उमेदवरानी नोंद घ्यावी.

(मनोज रानडे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर